ठाणे जिल्ह्याचे
सर्वाधिक खपाचे परिपूर्ण दैनिक

इष्ट ते छापणार
संस्थापक : नरेंद्र बल्लाळ

# ठाणेवैभव

THANE VAIBHAV RNI REGD NO. 27378/75 POSTAL NO. THC/186/2016-2018

Date of Posting-Daily | वर्ष ४४ ★ अंक ७१ ★ मंगळवार ★ ६ नोव्हेंबर २०१८ ★ पाने ८ ★ रु. ३



## शिवकृपा पतपेढीला सहकार भूषण पुरस्कार प्रदान

**ठाणे, दि.५(वार्ताहर) -राज्यांच्या सहकार क्षेत्रात दिपस्तंभाप्रमाणे उत्कृष्ट काम करीत असलेल्या शिवकृपा सहकारी पतपेढी लि. मुंबई या संस्थेला सन २०१६-१७ या वर्षीचा महाराष्ट्र शासनाचा सहकार भूषण हा अत्यंत मानाचा पुरस्कार राज्याचे सहकार मंत्री सुभाष देशमुख आणि राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष शेखर चरेगावकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.**

या प्रसंगी आ. अॅड. आशिष शेलार, मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष प्रवीण दरेकर, सहकार विभागाच्या प्रधान सचिव आभा शुक्ला आणि सहकार आयुक्त सतीश सोनी उपस्थित होते. रोख रक्कम आणि स्मृतीचिन्ह असे पुरस्काराचे स्वरुप आहे. या प्रसंगी संस्थेचे संस्थापक आणि अध्यक्ष कृष्णा शेलार, उपाध्यक्ष वसंत चव्हाण, संस्थापक, संचालक चंद्रकांत वंजारी, माजी अध्यक्ष अविनाश भोसले आणि इतर सर्व संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी पांडुरंग घाडगे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

महाराष्ट्रातील पतसंस्था चळवळीत गुणात्मकदृष्ट्या प्रथम क्रमांकावर असलेली आणि गेली ३६ वर्षे राज्यातील सहकार क्षेत्रात दीपस्तंभासारखी आदर्शवत काम करीत असलेल्या शिवकृपा पतपेढीचे संपूर्ण महाराष्ट्र कार्यक्षेत्र असून एकूण ८७ शाखा, सात विभागीय कार्यालये आणि ठाणे येथे सुसज्ज असे प्रशासकीय कार्यालय आहे. संस्थेच्या स्वमालकीचे रबाळे, एमआयडीसी, नवी मुंबई येथील नवीन प्रशासकीय कार्यालयाच्या आठ मजली इमारतीचा भूमीपूजन समारंभ नुकताच होऊन कामही सुरू झाले आहे. शिवकृपा पतपेढीस यापूर्वीही महाराष्ट्र राज्य सहाकरी पतसंस्था फेडरेशनचा सर्वोत्कृष्ट आदर्श पतसंस्था पुरस्कार प्राप्त झाला आहे. त्याचबरोबर २०१७-१८ चा सलग दोन्ही वर्षे राज्यस्तरीय दिपस्तंभ पुरस्कारही आपल्या संस्थेने पटकावला आहे.

२०१६ सालचा प्रथम क्रमांकाचा बॅंको पतसंस्था पुरस्कार आणि प्रतिबिंब वार्षिक अहवाल स्पर्धा मुंबई विभागातून प्रथम क्रमांक प्राप्त झाला आहे. अशा प्रकारे विविध मान्यवर संस्थांनी आपल्या संस्थेस एकूण १६ पुरस्कारांनी सन्मानित केले आहे.